


# पारनेर दर्शन





वर्ष ३ अंक २०, शुक्रवार ६ डिसेंबर २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

## ‘समंदर’ लौट के आया ‘सागर’से!

# देवेंद्रयुगास प्रारंभ

### फडणवीस तिसऱ्यांदा मुख्यमंत्री



**मुंबई:प्रतिनिधी**

**संपूर्ण राज्याला ज्या क्षणाची प्रतीक्षा होती अखेर तो क्षण महाराष्ट्राने अनुभवला आहे. देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्यासमक्ष त्यांनी शपथ ग्रहण केली. मुंबईच्या आझाद मैदानावर अत्यंत दिमाखदार असा महाशपथविधी सोहळा पार पडला. पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि जेपी नड्डा यांच्या उपस्थितीत हा शपथविधी सोहळा पार पडला. यावेळी देवेंद्र फडणवीसांसोबत शिवसेना पक्षप्रमुख एकनाथ शिंदे आणि राष्ट्रवादी पक्षाचे प्रमुख अजित पवार यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली.**

**अखेर ते पुन्हा आले, फडणवीसांनी करुन दाखवलं**

विधानसभा निवडणुकीत विरोधकांचा सुपडा साफ करत महायुतीने बहुमत प्राप्त केलं. यात एकट्या भाजपने १३२ जागा जिंकल्या, त्यामुळे भाजपसाठी हा एक मोठा विजय ठरला. यासह भाजप राज्यातील सर्वात मोठा पक्ष ठरला. हा विजय आजपर्यंतचा सर्वात मोठा विजय मानला गेला. त्यामुळे मुख्यमंत्रिपद हे भाजपकडेच जाणार हे निश्चित होतं. पण तरीही जवळपास १० - ११ दिवसांनी मोठ्या राजकीय घडामोडींनंतर मुख्यमंत्रिपदाची घोषणा झाली. भाजपच्या विधीमंडळ गटनेतेपदी एकमुखाने देवेंद्र फडणवीसांची निवड करण्यात आली आणि मी पुन्हा येईन म्हणणारे फडणवीस तिसऱ्यांदा मुख्यमंत्रिपदावर विराजमान झाले आहेत.

तर, उपमुख्यमंत्रिपदाबाबत शपथविधीच्या काही तासांपूर्वीपर्यंत घडामोडी घडत होत्या. सकाळपर्यंत एकनाथ शिंदे हे उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेणार की नाही याबाबत संभ्रम होता. मात्र, अखेर फडणवीसांच्या प्रयत्नांना यश आलं आणि एकनाथ शिंदे यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. तर दुसरे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही शपथ ग्रहण केली.

मुंबईच्या आझाद मैदानावर या शपथविधी सोहळ्यासाठी जय्यत तयारी करण्यात आली होती. भव्य असा मंच आणि भलामोठा मांडव आझाद मैदानात टाकण्यात आला होता. या सोहळ्यासाठी देशभरातील विविध राज्यांच्या मुख्यमंत्र्यांना निमंत्रण देण्यात आलं होतं. यावेळी मंचावर भाजपचे बडे नेते उपस्थित होते. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, अर्थमंत्री निर्मला सीतारामण, पियुष गोयल, केंद्रीय मंत्री रक्षा खडसे, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, यांच्यासह देशातील विविध राज्यांचे मुख्यमंत्री उपस्थित होते. तसेच, अनेक राज्यांचे उपमुख्यमंत्रिही यावेळी उपस्थित होते.

त्याशिवाय, उद्योगपती अनिल अंबानी, अनंत अंबानी राधिका मर्चंट यांनीही या सोहळ्याला उपस्थिती लावली. तर बॉलिवूडचे अनेक तारेही येथे उपस्थित होते. शाखरुख खान, सलमान खान, रनवीन सिंह, विक्की कौशल, माधुरी दिक्षित त्यासह सचिन तेंडुलकर हा देखील या शपथविधीला उपस्थित होता.

## निसर्गोपचार संस्थेला पदव्युत्तर अभ्यासक्रमाची परवानगी द्या

### खा. नीलेश लंके यांची मंत्री प्रताप जाधव यांच्याकडे मागणी

**नवी दिल्ली : प्रतिनिधी**

**पुणे येथील राष्ट्रीय निसर्गोपचार संस्थेला पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी परवाणगी देण्याची मागणी खासदार नीलेश लंके यांनी केंद्रीय आयुष मंत्री प्रताप जाधव यांच्याकडे निवेदनाद्वारे गुरूवारी केली.**



■ राष्ट्रीय निसर्गोपचार संस्थेला पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी परवाणगी देण्याची मागणी खा. नीलेश लंके यांनी केंद्रीय आयुष मंत्री प्रताप जाधव यांच्याकडे निवेदनाद्वारे गुरूवारी केली.

मंत्री जाधव यांना देण्यात आलेल्या निवेदनात खासदार लंके यांनी नमुद केले आहे की, सन २०२१-२१ मध्ये कोरोना महामारीसारख्या भयंकर आजरावर मात करण्यासाठी आपण आपल्या मतदारसंघात १ हजार १०० बेडचे कोव्हीड सेंटर चालविले. या कोव्हीड सेंटरमध्ये नियमित उपचार पध्दतीबरोबरच आयुर्वेद, निसर्गोपचार व योगा अशा पध्दतींचा अवलंब करून उपचार करण्यात आले. त्यातून अनेक रूग्णांनी कोरोनावर मात केली.

काही महिन्यांपूव आयुष मंत्रालयाच्या आखत्यारीत येणाऱ्या पुणे येथील राष्ट्रीय निसर्गोपचार संस्थेस भेट दिली असता संपूर्ण संकुलाची रचना तसेच उत्तम प्रकारचे नियोजन तिथे आहे. या निसर्गोपचार संस्थेस दिलेल्या भेटीदरम्यान झालेल्या चर्चेतून पुढे आलेल्या गोष्टींनुसार या संस्थेस पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करण्याची परवानगी देणे गरजेचे आहे. तसेच महाराष्ट्र शासनाच्या मान्यतेने या संस्थेमार्फत देण्यात येणाऱ्या बीएनवायएस या पदवीच्या शिक्षणाचा कालावधी साडेपाच वर्षांचा करण्यात यावा, जेणेकरून या अभ्याक्रमाला इतर राज्यातही मान्यता मिळू शकेल याकडे खा. लंके यांनी मंत्री जाधव यांचे लक्ष वेधले आहे.

खा. लंके यांनी केलेल्या मागण्यांचा सकारात्मक विचार करून निर्णय घेण्याची ग्वाही मंत्री जाधव यांनी यावेळी दिली.

**डॉक्टर पदवीसाठी परवानगी द्या**

**राज्य शासनाच्या ३१ जानेवारी २०१९ च्या निर्णयानुसार महाराष्ट्र विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्यामार्फत योग व निसर्गोपचार पदवी बीएनवायएस या अभ्याक्रमास मान्यता देण्यात आलेली आहे. हा अभ्यासक्रम पुर्ण केलेल्या उमेदवारांना डॉक्टर ही पदवी लावण्यास परवाणगी नाही. ही अट रद्द करून हा अभ्यासक्रम पुर्ण केलेल्या व्यक्तिस डॉक्टर ही पदवी लावण्यास परवानगी देण्यात यावी. तामिळनाडू, कर्नाटक, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, तेलंगणा, गुजरात, राजस्थान या राज्यांमध्ये बीएनवायएस चा अभ्यासक्रम पुर्ण केल्यानंतर डॉक्टर ही पदवी लावण्यास परवानणी देण्यात आल्याचेही खा. लंके यांनी या निवेदनात नमुद केले आहे.**

## जोड नसलेल्या वस्त्यांच्या रस्त्यांना मंजुरी द्या

### खा. नीलेश लंके यांचे मंत्री शिवराजसिंह चौहान यांना साकडे

**नवी दिल्ली : प्रतिनिधी**

**नगर लोकसभा मतदारसंघातील जोड नसलेल्या वस्त्यांच्या रस्त्यांचा सन २०२४-२५ च्या प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेमध्ये समावेश करून त्यास मंजुरी देण्याचे साकडे खासदार नीलेश लंके यांनी केंद्रीय ग्रामविकास आणि कृषि, शेतकरी कल्याण मंत्री शिवराजसिंह चौहान यांना घातले.**



■ जोड नसलेल्या वस्त्यांच्या रस्त्यांचा सन २०२४-२५ च्या प्रधानमंत्री ग्रामसडक

गुरूवारी खा. नीलेश लंके यांनी मंत्री चौहान यांनी भेट देऊन रस्त्यांच्या कामांसंदर्भात निवेदन सादर केले. या निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, नगर लोकसभा मतदारसंघात रस्त्यांच्या जाळयाचा प्रचंड अनुषेश आहे. अनेक गावे मुख्य रस्त्यांना जोडलेली नसल्याने स्थानिक नागरीकांना तालुका किंवा जिल्हयाच्या ठिकाणी जाण्यासाठी अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. पावसाळयात नागरीकांना दैनंदिन जीवनामध्ये मोठा त्रास सहन करावा लागतो. दळणवळणात अडचणी येत असल्याने त्यांचे जनजीवन ठप्प होते. उर्वरीत पान ३ वर

## कुकडीचे १० तर पिंपळगांवचे ७ डिसेंबरला आवर्तन

### आमदार काशिनाथ दाते यांची माहिती | उपमुख्यमंत्री अजित पवार यांची घेतली भेट

**मुंबई : प्रतिनिधी**

**कुकडी व पिंपळगांवजोगा कालव्यांच्या लाभक्षेत्रातील शेतकरी बांधवांच्या मागणीनुसार कुकडी डाव्या कालव्याचे १० डिसेंबर रोजी तर पिंपळगांव जोगा कालव्याचे ७ डिसेंबर रोजी आवर्तन सोडण्यात येईल अशी ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली. आमदार काशिनाथ दाते यांनी मुंबईत पवार यांची भेट घेऊन दोन्ही कालव्यांची आवर्तने सोडण्याबाबत मागणी केली होती.**



■ कुकडी व पिंपळगांवजोगा कालव्याचे आवर्तन सोडण्याची मागणी आ. काशिनाथ दाते यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे केली.

आ. काशिनाथ दाते यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने अजित पवार व मा. मंत्री दिलीप वळसे पाटील यांची भेट घेऊन आवर्तनासंदर्भात चर्चा केली. यासंदर्भात दाते यांनी कुकडी प्रकल्पाचे कार्यकारी अभियंता प्रशांत कडूसकर यांच्याशीही चर्चा केली.

शिष्टमंडळामध्ये पक्षाचे जिल्हाध्यक्ष अशोक सावंत, भाजपाच्या प्रदेश कार्यकारणीचे सदस्य विश्वनाथ कोरडे, जिल्हा बँकेचे संचालक प्रशांत गायकवाड, वसंत चेडे, सुनील थोरात, विश्वनाथ चौधरी यांचा समावेश होता.

आ. दाते यांनी निवडणूकीची रणधुमाळी संपल्यानंतर मतदारसंघातील विविध प्रश्नांवर काम करण्यास सुरूवात केली असून त्याचाच एक भाग म्हणून कुकडी व पिंपळगांव जोगा कालव्यांच्या आवर्तनासंदर्भात त्यांनी अजित पवार व दिलीप वळसे यांची भेट घेऊन चर्चा केली.

तालुक्यातील शेतकरी नगदी पीक म्हणून कांदा पीकाला पसंती उर्वरीत पान ३ वर

## “म्हणून ते पुन्हा येईन, असे म्हणाले होते!”

### अमृता फडणवीसांनी सांगितला ‘त्या’ घोषणेचा अर्थ



**मुंबई : प्रतिनिधी**

**महायुतीला विधानसभा निवडणुकीत बहुमत प्राप्त झाल्यानंतर आज महायुतीचा शपथविधी सोहळा पार पडत आहे. देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्रीपदाची तर अजित पवार आणि एकनाथ शिंदे हे उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेणार आहेत. या पार्श्वभूमीवर देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांनी माध्यमांशी संवाद साधताना ही घटना त्यांच्यासाठी किती महत्त्वाची आहे, याबद्दल माहिती दिली. तसेच फडणवीस मुख्यमंत्री झाल्यानंतर पहिला निर्णय कोणता घेणार? याबद्दल प्रश्न विचारला असता त्याचेही त्यांनी समर्पक उत्तर दिले.**

अमृता फडणवीस म्हणाल्या, “देवेंद्र फडणवीस सहाव्यांदा आमदार झाले आणि तिसऱ्यांदा मुख्यमंत्री होत आहेत, याबद्दल खूप आनंद वाटतो. पण आनंदापेक्षा एका जबाबदारीची आम्हाला जाणीव आहे. त्यांच्या मेहनतीला यश मिळाले.महायुतीआता एकत्र आहे आणि महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी कायम एकत्र राहिल. त्यांचे जीवन संघर्षपूर्ण राहिलेले आहे. मी हे जवळून पाहिले आहे. जिद्द, चिकाटी आणि संयम या गुणांमुळेच ते आज इथवर पोहोचले आहेत. संयम हा त्यांचा सर्वोच्च असा गुण आहे.”

लाडकी बहीण योजनेचे केले कौतुक यावेळी अमृता फडणवीस यांनी लाडकी बहीण योजनेचे कौतुक केले. मंत्रिमंडळात जास्तीत जास्त महिलांना संधी दिली जाईल का? असा प्रश्न त्यांना विचारण्यात आला होता. त्यावर त्या म्हणाल्या, निश्चितच लाडकी बहीण ही एक चांगली योजना होती. त्यामुळेच अनेक महिला महायुतीशी जोडल्या गेल्या. संसदेत महिला आरक्षणाचे विधेयक मंजूर झाले आहे. आता लवकरच त्याची उर्वरीत पान ३ वर

## शिरुर तालुक्यातील ‘त्या’ गोमातेचे मुख्यमंत्र्यांकडून पूजन !

### ■ टेम्पोतून गाय थेट मुख्यमंत्र्यांच्या सागर बंगल्यावर ■ आमदाबाद येथील भाऊसाहेब माशेरे यांची गाय

**शिरुर : सतीश डोंगरे**

**मुख्यमंत्रिपदाची शपथ घेण्याआधी देवेंद्र फडणवीस यांनी सागर बंगल्यावर गो मातेची पूजा केली. खास पूजेसाठी ही गाय शिरूर तालुक्याच्या आमदाबाद गावातून मागविण्यात आली होती. मुंबईतील गो पूजनानंतर शिरुर तालुक्यात मात्र याची चांगलीच चर्चा रंगली.**



देवेंद्र फडणवीस यांनी भारतीय जनता पार्टी किसान मोर्चाचे प्रदेश सरचिटणीस संदीप गिड्डे यांच्यामार्फत शिरुर तालुक्यातील आमदाबाद येथील कार्यकर्त्यांना पूजनासाठी गाय घेऊन येण्याची सूचना केली होती. त्यानुसार कार्यकर्त्यांनी गावातील भाऊसाहेब माशेरे यांची गाय स्वच्छ धुवून तिला टेम्पोत घालून आज पहाटेच मुंबई कडे प्रयाण केले.

शपथविधीसाठी रवाना होण्यापूर्वी देवेंद्र फडणवीस यांनी दुपारी सागर बंगल्यावर या गोमातेचं पूजन केले. बळीराजाचं राज्य यावं म्हणून ही पूजा करण्यात आली असल्याचे यावेळी देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. खास गीर जातीची ही गाय उर्वरीत पान ३ वर



# चंदेरी

## तमन्ना भाटिया म्हणते, महिलांनी आधी स्वतःचा दृष्टिकोन बदलावा!

**दाक्षिणात्य सिनेसृष्टीसह बॉलीवूडमध्ये आपल्या अभिनयाने तमन्ना भाटियाने साऱ्यांनाच भुरळ पाडली आहे. तमन्ना कायम तिच्या कामामुळे चर्चेचा विषय ठरते. तसेच ती महिला सशक्तीकरणावरही परखडतेने स्वतःचे मत मांडते. नुकतेच तमन्नाने सिनेविश्वात महिलांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलावा यावरही भाष्य केले आहे. तमन्नाने यासाठी महिलांनी आधी स्वतःचा दृष्टिकोन बदलणे किती गरजेचे आहे, हे सांगितले आहे.**



सध्या तमन्ना भाटिया 'सिकंदर का मुकद्दर' चित्रपटाच्या प्रमोशनच्या कामात व्यस्त आहे. अशात नुकतीच तिने मुलाखत दिली. त्यावेळी सिनेविश्वात महिलांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलण्यासाठी तिने तिचे मत व्यक्त केले. तमन्ना म्हणाली की, महिलांची सर्वात मोठी चूक म्हणजे त्या स्वतःला एक महिला म्हणून संबोधित करतात. मात्र, त्यांनी स्वतःची ओळख एक महिला म्हणून सांगण्याऐवजी एक व्यक्ती आणि मानव असल्याची सांगितली पाहिजे. स्त्री-पुरुष हा भेदभाव आपल्यापासूनच सुरू झाला आहे. महिलांनी त्यांची मानसिकता तशी करून घेतली आहे. महिलांनी ही मानसिकता बदलली पाहिजे. त्यांनी स्वतःला पुरुषांच्या बरोबरीचे समजले पाहिजे. आपणच हा बदल स्वीकारला नाही तर अन्य व्यक्ती हा बदल कसे स्वीकारतील?, असे तमन्नाने यावेळी सांगितले आहे.

सिनेविश्वात महिलांना समान वागणूक मिळावी यावर बोलताना तमन्ना म्हणाली, की मी निश्चितपणे स्वतःला एक अशी व्यक्ती समजते, जी विविध गोष्टी करू शकते. मला खरंच असे वाटते की, तुम्हाला जर सिनेविश्वात मोठे नाव कमवायचे असेल तर आधी तुम्ही यात सहभागी झाले पाहिजे. तुम्हाला या खेळात स्वतःला उतरावे लागेल, असेही तमन्नाने पुढे सांगितले. तमन्नाने महिलांनी ही मानसिकता बदलावी यासाठी काय केले पाहिजे हे सांगितले. ती म्हणाली, की काही व्यक्ती असे म्हणतात की, एका रात्रीत सारे काही बदलले जाऊ शकते. मात्र, फक्त असे बोलणे आणि प्रत्यक्षात असे करणे यात फार फरक आहे. सिनेविश्वातील महिलांसाठी असलेली मानसिकता बदलण्यासाठी तुम्हाला स्वतःला आधी यात सहभागी व्हावे लागेल. अनेक महिला असा विचार करतात की, त्या काही ठराविक गोष्टींची मागणी करू शकत नाहीत. तसे केल्यास त्यांना येथून काढून टाकले जाईल, त्यामुळे आधी असे विचार आपण आपल्या डोक्यातून दूर केले पाहिजेत. जर तुम्हाला तुमचे काम व्यवस्थित येत आहे, तर तुम्ही मागे हटू नका; माझी मानसिकता कायम सकारात्मक असते, मी कधीच असा विचार केला नाही की मी हे करू शकणार नाही. मी नेहमी स्वतःबद्दल सकारात्मक विचार केला आहे. जर तुम्हीही असा विचार केला, तरच काहीतरी बदल घडू शकतो, असे तमन्ना म्हणाली.

## अनन्या पांडेने सांगितला वडिलांच्या आयुष्यातील 'तो' वाईट काळ!



**बॉलीवूड अभिनेत्री अनन्या पांडे सोशल मीडियावर चर्चेत असते. अभिनयाच्या जोरावर ती सिनेविश्वात तिची वेगळी ओळख निर्माण करत आहे. अनन्याने आजवर बॉलीवूडला अनेक चांगले चित्रपट दिले आहेत. अभिनयाच्या कारकिर्दीत सध्या ती यशाच्या दिशेने वाटचाल करत आहे. अनन्या सध्या ज्या पद्धतीने बॉलीवूडमध्ये स्वतःची ओळख निर्माण करत यशाची एक एक पायरी चढत आहे, अगदी तसेच चंकी पांडे यांनीही बॉलीवूडमध्ये नाव कमावले होते. चंकी पांडे यांनी त्यांच्या काळात एकापेक्षा एक हिट चित्रपटांत अभिनय केला. मात्र, त्यांच्या आयुष्यातील ठराविक काळात त्यांना काही चढउतार सहन करावे लागल्याचे अनन्याने सांगितले आहे.**

अनन्याने वडिलांच्या आयुष्यात आलेल्या अडचणी आणि चढउतार यावर मोकळेपणाने भाष्य केले. अनन्या म्हणाली की, माझे वडील ८० आणि ९० च्या दशकातील मोठे अभिनेते आहेत. माझा जन्म झाला तेव्हा त्यांच्या करिअरमध्ये अनेक चढ-उतार सुरू झाले. मात्र, तरीही त्यांनी अनेक वेगवेगळी कामे करणे सुरू ठेवले. मी लहान असताना अनेकदा पाहिलं की, माझे वडील घरात बसून होते. त्यांच्या हातात काहीही काम नव्हतं. मी त्यांच्याबरोबर एक-दोनवेळा शूटिंगच्या सेटवरसुद्धा गेले होते. त्यांची लोकप्रियता इतकी होती की, त्यांच्यासाठी नेहमीच घराबाहेर गर्दी असायची. अनन्याने तिला वडिलांकडून काय शिकावे वाटते याबद्दलही सांगितले. ती म्हणाली की, माझे वडील अष्टपैलू आहेत. त्यांनी शक्य होईल तितक्या जास्त आणि विविध भाषांमध्ये काम केले आहे. त्यांनी छोट्या चित्रपटांत काम केले. त्यांनी मोठ्या चित्रपटांत काम केले. त्यांनी मुख्य भूमिका, छोटी भूमिका आणि नकारात्मक भूमिकासुद्धा साकारल्या आहेत. मला वाटते, त्यांच्यातील ही चांगली गोष्ट माझ्यामध्येसुद्धा असली पाहिजे. मुलाखतीमध्ये अनन्याने वडिलांबरोबर तिचे काही मतभेद होतात यावरही भाष्य केले. माझ्या वडिलांना व्यावसायिक चित्रपट सर्वात महत्त्वाचे वाटतात. कारण त्यांच्या बुद्धीमध्ये सिनेमा आणि अभिनयाची वेगळी परिभाषा आहे. मला प्रत्येक गोष्टीमध्ये थोडे फार काम करावे आणि सर्व काही शिकून घ्यावे असे वाटते. या विचारांशी माझे बाबा सहमत नाहीत. त्यांना असे वाटते, मी मोठ्या व्यावसायिक चित्रपटांमध्ये काम केले पाहिजे. मात्र, आता त्यांच्या या विचारात सुद्धा बदल होत आहे. 'कॉल मी बे'नंतर त्यांना माझ्यावर फार गर्व झाला. तसेच तुला जे हवं आहे तेच तू कर, असंही त्यांनी म्हटलं, असे अनन्याने सांगितले.



## विवेक ओबेरॉयने खरेदी केली आलिशान रोल्स रॉयस!

२००२ मध्ये 'कंपनी' चित्रपटातून पदार्पण करत विवेक ओबेरॉयने बॉलीवूडमध्ये एन्ट्री घेतली होती. यानंतर त्याच्या वैयक्तिक आयुष्याचा परिणाम करिअरवर होऊन अभिनेता बॉलीवूडपासून दुरावला गेला होता. एक काळ असा होता जेव्हा विवेकला कामंही मिळत नव्हतं. पण, या सगळ्यावर मात करून अभिनेत्याने आपला व्यवसाय सांभाळला. हळूहळू चित्रपटसृष्टीत पुनरागमन करून आपला एक वेगळा चाहतावर्ग निर्माण केला. सिनेविश्वापासून दूर असूनही आजच्या घडीला विवेकची संपत्ती करोडोंच्या घरात आहे. गेल्या तीन वर्षांपासून विवेक दुबईला स्थायिक झाला आहे. नुकतीच त्याने रोल्स रॉयस ही आलिशान गाडी खरेदी केली आहे.

रोल्स रॉयस खरेदी करून विवेकने आपल्या कुटुंबीयांना सुद्धा छानसं गिफ्ट दिलं आहे. सिल्व्हर ग्रे रंगाची विवेकची ही रोल्स रॉयस आलिशान गाडी पाहून अभित्याचे आई-बाबा, पत्नी सगळेच आनंदी होते. मिळालेल्या माहितीनुसार विवेकने ही रोल्स रॉयस गाडी दुबईत खरेदी केली आहे. गेल्या तीन वर्षांपासून तो दुबईत राहतो. त्याने खरेदी केलेल्या गाडीची किंमत तब्बल १२.२५ कोटी एवढी आहे.

## अभिनेत्री कल्कीकडे नव्हतं दोन वर्षे काम, वडापाववर काढले दिवस..!

**बॉलीवूडमध्ये अनेक अभिनेते आणि अभिनेत्री मोठा संघर्ष करीत काम मिळवतात. या कलाकारांना जोपर्यंत बॉलीवूडमध्ये मोठा ब्रेक मिळत नाही तोपर्यंत ते सामान्य माणसांप्रमाणेच आयुष्य व्यतीत करतात. अभिनेत्री कल्की कोचलीनच्या बाबतीतही असेच घडले. कल्की कोचलीनने अनुराग कश्यपच्या 'देव डी' या चित्रपटातून चित्रपटसृष्टीत पदार्पण केले आणि तिच्या कामाचे खूप कौतुकही झाले. मात्र, त्या कौतुक आणि प्रसिद्धीनंतरही कल्कीला पुढची दोन वर्षे कोणताही चित्रपट मिळाला नाही.**



अलीकडेच एका मुलाखतीत तिने तिच्या या प्रवासाबद्दल खुलासा केला आणि आर्थिक गरजांसाठी काही विशिष्ट प्रकारची कामे निवडल्याबद्दलही सांगितले. कल्कीने सांगितले की, तिच्या व्यावसायिक आयुष्यातला पहिला मोठा संघर्ष 'देव डी'नंतर सुरू झाला. तिने सांगितले, 'देव डी'नंतर तब्बल दोन वर्षे मला कोणताही चित्रपट मिळाला नाही. मला मिळालेला पुढचा चित्रपट 'जिंदगी ना मिलेगी दोबारा' होत, असे ती म्हणाली. या काळात तिने एका नाटकात काम केले. ज्यासाठी तिला एक लाख रुपयांचे पारितोषिक मिळाले होते.

जेव्हा तिला विचारण्यात आले की, या काळात तिने आर्थिक व्यवस्थापन कसे केले, तेव्हा कल्कीने सांगितले, मी वडापाव खाऊन आणि लोकल ट्रेनने प्रवास करून हा काळ निभावला. कल्कीने तिच्या प्रतिमेबद्दल सांगितले, लोकांना ती फार यशस्वी असल्याचे वाटते. पण ती प्रत्यक्षात त्यापेक्षा कमी यशस्वी आहे. ती म्हणाली, की लोक मला ओळखतात. त्यांना माझा चेहरा परिचित आहे; पण जेव्हा ते मला लोकल ट्रेनमध्ये पाहतात, तेव्हा त्यांना धक्का बसतो. ते म्हणतात, तुझ्याबरोबर बॉडीगार्ड का नाहीये? हा फार मोठा विरोधाभास आहे. खऱ्या आयुष्यात मी लोकांना खूप यशस्वी वाटते. पण प्रत्यक्षात मी इतकी यशस्वी नाहीये. कल्कीने सांगितले, की तिने चित्रपटसृष्टीत सुरुवातीच्या दिवसांपासून खूप मोठा प्रवास केला आहे. कल्की काही कामे केवळ पैशांसाठीच करते. ती प्रामुख्याने कॉर्पोरेट कार्यक्रमांमध्ये सहभागी होते. ती म्हणाली, की तिथे मला माहीत असतं की, हा फक्त देवाणघेवाणीचा व्यवहार आहे. तिथे त्यांना माझा चेहरा हवा असतो आणि मला पैसे, असे कल्कीने नमूद केले.

## सुपरस्टार नागार्जुन यांची होणारी सून आहे तरी कोण?

**दाक्षिणात्य सुपरस्टार अभिनेते नागार्जुन यांचा धाकटा मुलगा अखिल अक्किनेनी याने नुकतेच सोशल मीडियावर आपल्या होणाऱ्या पत्नीबरोबरचे रोमँटिक फोटो शेअर करत साखरपुड्याची घोषणा केली. लवकरच अखिल झैनब रावदजी हिच्याशी लग्नगाठ बांधणार आहे. या दोघांचा लग्नसोहळा पुढच्या वर्षी पार पडण्याची शक्यता आहे.**

नागार्जुन यांनी एक्सवर पोस्ट शेअर करत मुलाचा साखरपुडा झाल्याची आनंदाची बातमी सर्वांना दिली आहे. या पोस्टच्या माध्यमातून त्यांनी सोशल मीडियावर होणाऱ्या नव्या सुनेचं अक्किनेनी कुटुंबात स्वागत केलं होतं. अखिल हा अभिनेते नागार्जुन यांचा धाकटा मुलगा आहे. नागा चैतन्यचा तो सावत्र भाऊ आहे. २०१५ मध्ये त्याने सिनेविश्वात पदार्पण केलं होतं. 'हॅलो', 'मिस्टर मजनू' आणि 'मोस्ट एलिजिबल बॅचलर' यांसारख्या चित्रपटांमध्ये तो झळकला होता.



### कोण आहे झैनब रावदजी?


अखिलची होणारी पत्नी नेमकी कोण आहे याबद्दल सोशल मीडियावर चर्चा रंगल्या होत्या. झैनब सोशल मीडियावर सक्रिय नाही. ती एका प्रतिष्ठित व्यावसायिक कुटुंबातली आहे. तिचे वडील झुल्फी रावदजी हे प्रसिद्ध उद्योगपती आहेत. हैदराबादमध्ये जन्मलेल्या २७ वर्षीय झैनबचं मुंबईत घर आहे. याशिवाय एक प्रतिभावान चित्रकार म्हणून तिची ओळख आहे. चित्रकलेबरोबर झैनबने अभिनय क्षेत्रातही काम केलं आहे. ती एमएफ हुसैन यांच्या 'मीनाक्सी : ए टेल ऑफ थ्री सिटीज'मध्ये अभिनेत्री तब्बू आणि कुणाल कपूर यांच्यासह झळकली आहे. झैनबचे वडील बांधकाम उद्योगातील अनुभवी व्यावसायिक आहेत, तर तिचे भाऊ, झैन रावदजी, ZR रिन्यूएबल एनर्जी प्रायव्हेट लिमिटेडचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक म्हणून जबाबदारी सांभाळतात. आता अखिल अक्किनेनी आणि झैनब लग्न केव्हा करणार याची चाहत्यांच्या मनात उत्सुकता निर्माण झाली आहे.

## १० वर्षे जे सहन केलं, त्याला तोड नाही!

### अभिनेत्री झरीना वहाबचे विशेष मुलाखतीत भाष्य



**अभिनेत्री जिया खान ३ जून २०१३ रोजी मुंबईमधील जुहू परिसरातील घरात गळफास लावलेल्या अवस्थेत आढळली होती. जियाचा मृत्यू झाला, त्यावेळी ती २५ वर्षांची होती. जियाने आत्महत्येपूर्वी सूरजसोबतच्या नात्याबाबत लिहिलेले पत्रही पोलिसांना सापडले होते. त्याच्या आधारे पोलिसांनी सूरजला आरोपी केलं होतं. त्याच्यावर जिया हिला आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा आरोप ठेवला होता. या प्रकरणी पोलिसांनी त्याला अटकही केली होती. याच आरोपांतर्गत सूरजवर १० वर्षे खटला चालवण्यात आला. अखेर त्याची एप्रिल २०२३ मध्ये निर्दोष मुक्तता करण्यात आली. जियाच्या आत्महत्या प्रकरणावर सूरजची आई अभिनेत्री झरीना वहाबने एका मुलाखतीत भाष्य केलं आहे.**



जिया खानने सूरज पंचोलीला भेटण्यापूर्वी अनेकदा आत्महत्येचा प्रयत्न केला होता, असा दावा झरीनाने केला आहे. तिने त्याआधीही ४-५ वेळा आत्महत्येचा प्रयत्न केला होता. पण नशीब असं होतं की ती माझ्या मुलाबरोबर असताना हे सगळं घडलं, असं झरीना म्हणाली. सूरज हा अभिनेता आदित्य पंचोली व झरीना वहाब यांचा मुलगा आहे. जियाने आत्महत्या केली तेव्हा सूरज तिला डेट करत होता. जियाने आत्महत्या केल्यावर सूरजला अटक झाली होती. या प्रकरणाचा कुटुंबावर कसा परिणाम झाला, त्याबाबत झरीनाने सांगितलं. १० वर्षे हे सगळं सहन करावं लागलं, असंही झरीना म्हणाली.

**सूरजच्या करिअरवर परिणाम**

आम्ही सर्वजण खूप वाईट काळातून गेलो, पण माझा एका गोष्टीवर विश्वास आहे. जर तुम्ही खोटं बोलून कोणाचंही आयुष्य उद्ध्वस्त करत असाल तर तुम्हाला त्याची व्याजासह परतफेड करावीच लागते. सूरज दोषी नव्हता, आम्ही सगळं सहन केलं, १० वर्षे लागली पण तो त्यातून निर्दोष बाहेर पडला आणि मी आनंदी आहे. या घटनेचा सूरजच्या करिअरवरही परिणाम झाला, असं झरीना म्हणाली. सूरजने २०१५ साली 'हिरो' चित्रपटातून बॉलीवूडमध्ये पदार्पण केलं होतं. या सिनेमात अथिया शेट्टीदेखील मुख्य भूमिकेत होती. या व्यतिरिक्त सूरजने 'बी हॅप्पी', 'हवा सिंग', 'टाइम टू डान्स', 'सॅटेलाइट शंकर' या सिनेमांमध्ये काम केलं आहे.



## शॉर्ट न्यूज

### श्रीरामपुरात ताकदीने लढणार

**श्रीरामपूर :** आगामी काळातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सर्व निवडणुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गट ताकदीने लढविणार असल्याची माहिती माजी आमदार लहू कानडे यांनी दिली. तत्पूर्वी कानडे यांनी मुंबई येथे उपमुख्यमंत्री अजित पवार तसेच महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची भेट घेतली. विधानसभेतील पराभवानंतर संपर्क कार्यालयात आयोजित कार्यकर्त्यांच्या आभार मेळाव्यात कानडे बोलत होते. यावेळी माजी नगराध्यक्ष अनुराधा आदिक, राष्ट्रवादीचे प्रदेश सचिव अरुण नाईक, अजित कदम, अमृत धुमाळ, माजी नगरसेवक अशोक कानडे उपस्थित होते.

### प्रलंबित कामांना आ.कर्डिले गती देतील

**राहुरी :** केंद्रात आणि राज्यात भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वाखालील सरकार असल्यामुळे आ. शिवाजीराव कर्डिले यांच्या कारकिर्दीत प्रलंबित विकास कामांना गती मिळेल, असा विश्वास माजपा नत आणि कौशल्य विकास समितीचे सदस्य विनायकराय देशमुख यांनी व्यक्त केला. देशमुख यांच्या हस्ते सोमवारी नवनिर्वाचित आमदार शिवाजीराव कर्डिले पांचा व भाजपा युवा मोर्चाचे अध्यक्ष अक्षय कर्डिले यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

### विहिरीत पडलेल्या बिबट्याला जीवदान

**श्रीगोंदा :** तालुक्यातील काष्टी येथील शेतकरीमहादेव खटावकर यांच्या विहिरीत पडलेल्या बिबट्याला बाहेर काढण्यात वन विभागाला यश आले. स्थानिक वनपरिक्षेत्र अधिकारी दीपाली भगत यांनी दौंड येथील इको रेस्क्यू वन्यजीव बचाव पथकाला माहिती दिली. वन कर्मचारी, रेस्क्यू पथक व स्थानिक प्राणीमित्रांच्या संयुक्त प्रयत्नाने या बिबट्याला बाहेर काढण्यात आले. काष्टी येथील खटावकर यांच्या विहिरीत मंगळवारी ( ३ डिसेंबर) पहाटे भक्ष्याच्या शोधात फिरणारा बिबट्या पडला. सकाळी शेतकऱ्यांनी श्रीगोंदे व दौंड येथील रेस्क्यू टीमला कळवले.

### महायुतीला मिळालेले संख्याबळ संशयास्पद

**संगमनेर :** एव्हढा ट्राईक रेट कसा असू शकतो असा प्रश्न उपस्थित करत महायुतीला मिळालेले संख्याबळ संशयास्पद असल्याचा आरोप काँग्रेस पक्षाचे जेष्ठनेते बाळासाहेब थोरात यांनीकेला आहे. माध्यमांशी बोलताना थोरात यांनी ही शंका व्यक्त करताना महायुतीला मिळालेल्या महायशाबद्दलही शंका सांगत आपले मत व्यक्त केले. ज्यांच्या नेतृत्वाखाली निवडणुका लढवल्या त्या काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदेचा सन्मान राखला जाईल का अशी शंकाही थोरात यांनी उपस्थित केली आहे.

### न्यामत बाबा दर्गा यात्रा उत्सवाची नियोजन बैठक

**नेवासा :** तालुक्यातील कुकाणा येथील हजरत सय्यद न्यामत बाबा दर्गा यात्रा उत्सवाच्या नियोजनासाठी काल मंगळवारी ३ डिसेंबर रोजी पोलीस निरिक्षक धनंजय अ. जाधव यांनी यात्रा कमिटीची बैठक घेतली. या बैठकीस अब्दुल हफिस शेख, अमोल अभंग, वसंतराव देशमुख, भाऊसाहेब कोलते, कारभारी गोरडे, विलास देशमुख, इस्माईल शेख, राम जाधव, दौलत देशमुख, बालमभाई शेख, बाळासाहेब कापरे, एकनाथ कापरे, इनूस बालंदर, अरुणकुमार देशमुख, मुसाभाई इनामदार, इकबाल इनामदार, शकूर शेख, रामदास गोल्हार आदी उपस्थित होते.

# वकील ते तिसऱ्यांदा मुख्यमंत्री : देवेंद्र फडणवीसांचा प्रवास



देवेंद्र फडणवीस यांचा नागपूरच्या धर्मपीठ येथील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची शाखा ते महाराष्ट्राचे मुख्यमंत्री इथं पर्यंतचा प्रवास थक्क करणारा आहे. देवेंद्र फडणवीस यांची राजकीय कारकीर्द वयाच्या २२व्या वर्षी नागपूरमध्ये नगरसेवक ते मुख्यमंत्री पद अशी राहिली आहे. फडणवीसांच्या या राजकीय यशामध्ये त्यांच्या नेतृत्व गुण हेच कारणीभूत असल्याचे बोलले जाते.

वकिलीचं शिक्षण घेतलेले देवेंद्र फडणवीस यांची पार्श्वभूमी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी जोडली गेलेली आहे. राजकीय वर्तुळात देवेंद्र फडणवीस यांनी बुद्धिमत्ता आणि वाद-विवाद कौशल्याच्या जोरावर स्वत:ची वेगळी ओळख निर्माण केली आहे. फडणवीसांनी सलग सहा वेळा नागपूर दक्षिण पूर्व विधानसभा मतदारसंघातून विजय मिळवला असून यामधून फडणवीसांची या भागातील प्रसिद्धी आणि त्यांच्या कामाचा आवाका लक्षात येतो.

देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या वडीलांना तुरूंगात टाकणार्या पंतप्रधानांच्या नावाने चालवल्या जाणाऱ्या 'इंदिरा कॉन्व्हेंट' शाळेत जाण्यास नकार दिला होता. सरस्वती विद्यालयात शिकण्याचा निर्णय घेतल्यापासून सुरू झालेली फडणवीसांची राजकीय कारकिर्द महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री पदापर्यंत पोहचली आहे. वयाच्या अवघ्या २७व्या वर्षी देवेंद्र फडणवीस नागपूरचे सर्वात तरुण महापौर बनले होते. त्यानंतर राज्यातील गुंतागुंतीची राजकीय परिस्थिती मोठ्या कौशल्याने हाताळत ते पुढे महाराष्ट्राचे दुसरे ब्राम्हण मुख्यमंत्रीदेखील बनले.

विधानसभा निवडणूक प्रचारादरम्यान देवेंद्र फडणवीस यांनी आरएसएसचे सह सचिव अतुल लिमये आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'एक है तो सेफ है' या घोषणेचा पुरेपूर वापर करून घेतला. मौलाना सज्जाद नोमानी यांच्या वोट जिहाद वक्तव्यानंतर त्यांनी निवडणुकीला 'धर्म युद्ध' असे म्हणत देत हिंदू मतदारांना आपल्याकडे खेचून आणले.

देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्व गुणांमुळे त्यांनी राजकीय वर्तुळात मोठे नाव कमावले आहे. त्यांच्या नेतृत्वात भाजपाने विधानसभा निवडणुकीत ऐतिहासिक विजय मिळवला आहे. फडणवीस पहिल्यांदा २०१४ मध्ये महाराष्ट्राचे मुख्यमंत्री बनले, या वेळी त्यांना मराठा आरक्षण, समृद्धी महामार्गासारखे मोठं-मोठे प्रकल्प सुरू करणे अशा काही आव्हानांचा सामना करावा लागला.


देवेंद्र फडणवीस यांनी सिंचन घोटाळा उघड करून स्वत:ची योग्यता सिद्ध केली. तसेच भ्रष्टाचाराविरोधातील त्यांची भूमिका देखील यामुळे सर्वांपुढे आली. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रात अनेक पायाभूत सुविधांचा विकास करण्यात आला. जल युक्त शिवार योजना देखील फडणवीस यांनीच राज्यभर लागू केली.

# प्रसिध्द रिलस्टार हर्षदा जाधव होणार शिरुरच्या सूनबाई!

**बुरुंजवाडीच्या विशाल रुके यांच्याशी लग्नगाठ | मांडवगण फराटा येथे शनिवारी थाटात शुभमंगल**

**शिरुर : सतीश डोंगरे**

**विनोदी आणि मनोरंजनात्मक रिल्सच्या माध्यमातून घराघरात पोचलेली महाराष्ट्राची लाडकी रिलस्टार हर्षदा जाधव लग्नाच्या बेडीत अडकत आहे. शिरुर तालुक्यातील बुरुंजवाडी येथील चित्रपट निर्माते- दिग्दर्शक विशाल रुके यांच्याशी येत्या शनिवारी (दि. ७) ती लग्नगाठ बांधणार आहे. मांडवगण फराटा येथील पुण्याई लॉन्समध्ये थाटात हा विवाह समारंभ पार पडणार आहे.**



दौंड तालुक्यातील जिरेगांव हे हर्षदाचे मूळ गाव. दोन वर्षांपूर्वी विशाल रुके यांनी निर्मिती केलेल्या खर्डा या मराठी चित्रपटात हर्षदा हिने मुख्य नायिकेची भुमिका साकारली होती. तेव्हापासूनच या दोघांमध्ये सूर जुळल्याची कुणकुण चाहत्यांना लागली होती अखेर ती खरी ठरली.

हर्षदा ही सोशल मीडियावरील आघाडीची रिलस्टार आहे. आपल्या हसऱ्या, खेळकर, खोडकर आणि मिश्किल स्वभावातून हलक्या फुलक्या रिल्सच्या माध्यमातून तिने घराघरात भुरळ घातली आहे. नृत्यकलेतही ती पारंगत आहे. आपल्या अभिनयाने व दैनंदिन जीवनातील प्रसंगाच्या सादरीकरणाने तिने राज्यभरातील चाहत्यांकडून कौतुकाची थाप मिळविली आहे. इन्स्टाग्रामवर तिचे १० लाखांहून अधिक फॉलोअर्स आहेत. याशिवाय फेसबुकवर ४ लाख ५० हजार तर युट्युबवर २ लाख ५० हजार फॉलोअर्स आहेत. दहिहंडी, वाढदिवस यांसारख्या कार्यक्रमांना रिलस्टार म्हणून राज्याच्या कानाकोपऱ्यातून तिला मोठी मागणी असते.

सोशल मीडियावर या दोघांचे एकत्रित अनेक फोटो आणि व्हिडीओ व्हायरल झाले आहेत. यामध्ये काही व्हिडीओ मध्ये हे दोघेही एका समुद्र किनारी घोड्यावरुन फेरफटका मारताना दिसत आहेत. लग्न म्हटलं की मराठी कुटुंबात खूप प्रेमाने आणि आपुलकीने सगळे विधी पारंपरिक पद्धतींनी पार पाडले जातात. असाच एक विधी म्हणजे केळवण. जो लग्नाच्या आधी नातेवाईक आणि मित्र परिवार नवं दाम्पत्यासाठी करतात. तोही विधी हर्षदा आणि विशाल यांचा तितक्याच आनंदात नुकताच पार पडला. या केळवण कार्यक्रमाचे खास व्हिडिओ ही हर्षदाने आपल्या चाहत्यांसाठी सोशल मिडियावर शेअर केले आहेत. याशिवाय मंगळवारी महिलांचा घाणा बांगड्यांचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. लग्नाची पहिली पत्रिका आपल्या कुलदैवताला अर्पण करतांनाही हर्षदा आणि तिच्या कुटुंबियांचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. एकूणच हर्षदाच्या जिरेगावच्या घरी आनंदाच्या वातावरणात लगीनघाई सुरु आहे.

या विवाह समारंभाला शिरुर आणि दौंड तालुक्यातील स्थानिक राजकीय नेते त्याबरोबरच महाराष्ट्रातील नामवंत रिलस्टार आणिकलाक्षेत्रातील काही निवडक सेलिब्रिटी उपस्थित राहणार आहेत. हर्षदाच्या लग्नाची माहिती मिळताच चाहत्यांनी त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव केला आहे.

# शेतकऱ्यांनी ई-पीक पाहणीची नोंद करावी - उपजिल्हाधिकारी शारदा जाधव

**नगर : प्रतिनिधी**

**पीकविमा, पीककर्ज, नैसर्गिक आपत्ती, एमएसपी अंतर्गत पिकांची नोंद, अॅग्रीस्टीक अंतर्गत सर्व योजना तसेच शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी ठराविक मुदतीमध्ये ई-पीकपाहणी करुन घेण्याचे आवाहन महसूल उपजिल्हाधिकारी शारदा जाधव यांनी केले आहे.**




राज्यात ता. १ डिसेंबर पासून रब्बी हंगाम सुरू झाला आहे. शेतकऱ्यांना यापूर्वी पीक पाहणीसाठी ई-पीक पाहणी मोबाईल ॲप उपलब्ध होते. परंतू केंद्र शासनाच्या सुचनेप्रमाणे यामध्ये तांत्रिक बदल करत डिजिटल क्रॉप सर्वे (डीसीएस) मोबाईल ॲप उपलब्ध करुन देण्यात आले आहे. याच ॲपच्या माध्यमातून राज्यात ई-पीक पाहणी होणार आहे. शेतकरी स्तरावरील ई-पीकपाहणी करण्यासाठी ता. १ डिसेंबर ते १५ जानेवारी २०२५ ही मुदत आहे. तसेच सहायक स्तरावर ई-पीक पाहणी करण्यासाठी १६ जानेवारी ते २८ फेब्रुवारी २०२५ ही मुदत राहणार आहे.

**वाचकांच्या लेखणीतून**

# तत्त्वज्ञानाचा स्फोट



भारतीय तत्त्वज्ञान आणि संस्कृत काव्यशास्त्र अभ्यासत असताना स्फोटसिध्दान्त आणि ध्वनिसिध्दान्त वाचनात आला. ॐ या अक्षराच्या उच्चारणातून किंवा ध्वनीतून विश्व निर्माण झाले. असा एक सिध्दान्त आहे. त्यालाच तत्त्वज्ञान शास्त्रात स्फोटसिध्दान्त आणि काव्यशास्त्रात ध्वनिसिध्दान्त असे म्हणतात. पुढे एका मराठी साहित्यिकाचे एक वाक्य वाचनात आले. तो म्हणतो, प्रसंगाची ठिणगी पडताच तत्त्वज्ञानाचा स्फोट होतो. ते वाचून मी चकित झालो! कारण ते वाक्य माझ्या अंतर्मनाला भिडले होते. मला भारतीय तत्त्वज्ञानाचा स्फोटसिध्दान्त आणि संस्कृत काव्यशास्त्राचा ध्वनिसिध्दान्त आठवला. निठवा, आठवा...! या मथळ्याचा एक लेख मी लिहिला आहे. जुनी वजनमापाची पध्दत जाऊन आता अंतर मापनासाठी मिटर आणि वजन मापनासाठी किलो ग्रॅम अशी दशमान किंवा मेट्रिक प्रणाली आपण स्वीकारलेली आहे. तरीही आपल्या ग्रामीण भागात गहू, ज्वारी आदी धान्य मापनासाठी निठवा, आठवा, पायली हीच साधने अजूनही वापरली जातात. म्हणून मी लिहिले, संस्कृतीचे धागे चिवट असतात. सहसा तुटता तुटत नाहीत! प्रसंगाची ठिणगी पडताच तत्त्वज्ञानाचा स्फोट होतो . किती खरे आहे ते!


**नाना ढवळे**
८२८६९१३२२३
**निघोज, ता. पारनेर,जि. अहमदनगर.**

# डीएड, बीएड पात्रताधारक उमेदवारांची कंत्राटी भरती

**१८ ते ३८ वयोगटातील उमेदवार पात्र**

**नगर : प्रतिनिधी**

**स्थानिक स्वराज्य संस्थांच्या दहापेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळांमध्ये डीएड व बीएड पात्रताधारक उमेदवारांची कंत्राटी तत्त्वावर भरती करण्यात येणार आहे. यासाठी जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागाने अर्ज मागविले आहेत. जिल्ह्यात सुमारे ७० ते ८० शिक्षकांची मानधनावर नियुक्ती केली जाणार असल्याची माहिती शिक्षणाधिकारी भास्कर पाटील यांनी दिली.**



जिल्ह्यात दहापेक्षा कमी पटसंख्या असलेल्या किती शाळा आहेत, याची माहिती देखील मागविली आहे. तसेच पात्रताधारक डीएड व बीएड उमेदवारांकडूनही अर्ज मागविले आहेत. खुल्या वर्गासाठी १८ ते ३८ वर्षे वयोगटांतील उमेदवार पात्र आहेत. मागासवर्गीयांमध्ये वयोमर्यादा ४३ वर्षांपर्यंत पात्र असेल. ज्या शाळेत नियुक्ती होणार असेल, तेथील स्थानिक उमेदवारांना प्राधान्य राहील. त्यानंतर, तालुका व जिल्हा या अनुक्रमाने प्राधान्य दिले जाणार आहे.

ही नियुक्ती एका शैक्षणिक वर्षासाठी असेल तिला मुदतवाढीचा निर्णय शासकीय स्तरावर होईल. नियुक्त उमेदवारांना प्रतिमहिना १५ हजार रुपये मानधन मिळेल. या पदावर कायम शिक्षकाची नियुक्ती झाल्यास कंत्राटी उमेदवाराची सेवा समाप्त होणार आहे, असेही शासनाने स्पष्ट केले आहे. प्राथमिक शिक्षणाधिकारी पाटील यांनी ही माहिती दिली.

# सुखबीर सिंग बादल यांच्यावर गोळीबार

**पंजाबच्या सुवर्णमंदिरात थरार**

**अमृतसर : वृत्तसंस्था**

**पंजाबमधील अमृतसर येथे सुवर्ण मंदिराच्या प्रवेशद्वारावर माजी उपमुख्यमंत्री व शिरोमणी अकाली दलाचे नेते सुखबीर सिंग बादल यांच्यावर एका व्यक्तीने गोळीबार केल्याची घटना समोर आली आहे. या हल्ल्यात सुखबीर सिंग बादल हे थोडक्यात बचावलेत.दरम्यान या घटनेचा व्हिडीओ देखील समोर आला आहे. या गोळीबाराच्या घटनेनंतर उपस्थित लोकांनी गोळीबार करणाऱ्या व्यक्तीला ताब्यात घेतले. मात्र हा गोळीबार का करण्यात आला याबद्दल माहिती अजून समोर आलेली नाही.**

समोर आलेल्या व्हिडीओमध्ये निळ्या रंगाचा सेवादारांचा पोशाख घातलेले बादल त्यांच्या व्हील चेअरवर बसललेले दिसत आहेत.सोमवारी (ता.२) बादल यांना 'अकाल तख्त'कडून धार्मिक शिक्षा देण्यात आली आहे. त्यामुळे पाय फ्रॅक्चर असलले बादल हे व्हील चेअरवर बसून सुवर्ण मंदिराबाहेर सेवा देत होते. या घटनेबद्दल पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, गोळीबार करणाऱ्या व्यक्तीचे नाव नारायण सिंग चौरा असून त्याला ताब्यात घेण्यात आले आहे. या हल्ल्यामागील कारण अजून समजू शकलेले नाही.

पंजाबमधील शिरोमणी अकाली दल आणि पक्षाचे अध्यक्ष सुखबीर सिंग बादल यांच्यावर गंभीर आरोप



करत 'अकाल तख्त'चे जथेदार ग्यानी रघबीर सिंग यांनी सोमवारी बादल आणि इतर वरिष्ठ नेत्यांना 'धार्मिक शिक्षा सुनावली होती. या शिक्षेचा एक भाग म्हणून, बादल आणि २०१५ पासून राज्यातील मंत्र्यांसह अकाली दलाच्या 'कोअर कमिटी' सदस्यांना शौचालये स्वच्छ करणे, लंगर मध्ये सेवा करणे, नितनेम (दररोज शीख प्रार्थना) करणे आणि सुखमनी साहिबचे पठण करण्याचे आदेश दिले आहेत. मात्र आरोग्याच्या तक्रारींमुळे सुखबीर बादल आणि सुखदेव सिंग धिंडसा यांना गुरूंच्या निवासस्थानी दोन दिवस द्वारपाल म्हणून काम करण्यास, पारंपरिक सेवक पोशाख घालून भाले धारण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. बादल हे तेव्हापासून सेवादार म्हणून सुवर्णमंदिरात सेवा देत आहेत. ही सेवा देत असतानाच ही घटना घडली आहे.

(पान १ वरून)

## जोड नसलेल्या वस्त्यांच्या रस्त्यांना मंजुरी द्या

ग्रामीण भागातील रस्त्यांच्या समस्यांबाबत दखल घेऊन ग्रामीण जनतेचे जीवन सुलभ व्हावे, दळणवळणाला गती मिळावी यासाठी सन २०२४-२५ च्या प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेमध्ये निवेदनातील नमुद रस्त्यांचा समावेश करून त्यास मंजुरी देण्यात यावी व शहरे किंवा गावांशी जोडण्यासाठी या कामांना निधीची तरतुद करण्याची विनंती खा. लंके यांनी मंत्री शिवराजसिंह चौहान यांच्याकडे केली.

मंत्री चौहान यांनी खासदार नीलेश लंके यांच्या निवेदनाची दखल घेऊन सन २०२४-२५ च्या प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेत निवेदनातील नमुद रस्त्यांना मंजुरी देऊन निधीची तरतुद करण्याची ग्वाही दिली.

## कुकडीचे १० तर पिंपळगांवचे ७ डिसेंबरला आवर्तन

देतात. दोन्ही कालव्यांच्या लाभक्षेत्रात कांदा पिकासह इतर पिकांची मोठया प्रमाणावर लागवड करण्यात आली असून या पिकांना पाण्याची आवष्यकता भासू लागल्याने आवर्तन सोडण्याची मागणी आ. दाते यांच्याकडे करण्यात आली होती. शेतकऱ्यांच्या मागणीचा दाते यांनी पाठपुरावा करून आवर्तन सोडण्याबाबत निर्णय झाल्याने शेतकरी वर्गात समाधानाचे वातावरण आहे.

## "म्हणून ते पुन्हा येईन, असे म्हणाले होते!"

अंमलबजावणी होईल आणि महिलांचे प्रतिनिधित्व राजकारणात वाढलेले आपल्याला दिसेल. मी जेव्हा विधानसेच्या प्रचारात फिरत होते, तेव्हाच मला लाडकी बहीण योजना महिलांना किती जवळची वाटत आहे, याचा अनुभव आला होता.

**म्हणून ते पुन्हा येईन म्हणाले होते**

२०१९ च्या विधानसभा निवडणुकीआधीदेवेंद्र फडणवीस'मी पुन्हा येईन' असे म्हणाले होते. यावरून फडणवीस यांना बरेच ट्रोल करण्यात आले. आता ते खरोखर पुन्हा आले आहेत, यावर बोलताना त्या म्हणाल्या, ''जेव्हा आपल्याला काही साध्य करायचे असते. तेव्हा अर्जुनासारखे केवळ लक्ष्य असले पाहीजे. त्यांना पुन्हा खुर्चीसाठी यायचे नव्हते. त्यांना पुन्हा यासाठी यायचे होते कारण त्यांना विश्वास होता की, ते महाराष्ट्रासाठी जे काही करू शकतात, ते इतर कुणी करू शकत नाही. या विश्वासासाठी ते पुन्हा आलेले आहेत, याचा मला आनंद वाटतो.''

**पहिला निर्णय कोणता घेणार?**

मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर देवेंद्र फडणवीस पहिला कोणता निर्णय घेणार? असाही एक प्रश्न यावेळी अमृता फडणवीस यांना विचारण्यात आला होता. या प्रश्नाचे उत्तर देताना त्या म्हणाल्या, पहिला निर्णय नेमका कोणता असेल, याची मला कल्पना नाही. पण तो निर्णय नक्कीच लोकहिताचा असेल, हे मी ठामपणे सांगू शकते.

## शिरुर तालुक्यातील 'त्या' गोमातेचे मुख्यमंत्र्यांकडून पूजन !

शिरुर तालुक्यातील आमदाबाद येथून मागविण्यात आली होती.


या वेळी गाई समवेत आलेल्या भाऊसाहेब माशेरे, चेअरमन आबासाहेब जाधव, नितीन माशेरे, वैभव जाधव यांची देवेंद्र फडणवीस यांनी जातीने विचारपूस केली. त्यानंतर फडणवीस यांनी सर्वे देवाः स्थिता देहे सर्वदेवमयी हि गौः शपथविधीपूर्वी राज्यमाता, सर्वदेवमयी गोमातांचे पूजन करून आशीर्वाद प्राप्त केले... असे ट्वीट करीत गो पूजनाचे कार्यकर्त्यांसह छायाचित्र त्यांनी आपल्या ट्वीटरवर टाकले.आज संपूर्ण शिरुर तालुक्यात यांची चांगलीच चर्चा रंगली.

# लहरी हवामानामुळे पीकांवर रोगांचा प्रादुर्भाव

## शेतकऱ्यांच्या पदरी निराशा पडणार | वैरण भाव खाणार

सुपा : शरद रसाळ

**सप्टेंबर, ऑक्टोबरमधील अतिवृष्टीनंतर शेतातील उपळीनंतर बळीराजा सावरत असतानाच त्याला हवामानाशी मोठा संघर्ष करावा लागत आहे. ढगाळ वातावरणामुळे रब्बी पीकांना पोषक वातावरण नसल्याने मोठया प्रमाणावर रोगांचा प्रादुर्भाव झाला आहे. त्यामुळे महागडी औषधे खरेदी करून फवारण्या करण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे.**



अतिवृष्टीनंतर शेतकऱ्यांनी मोठया प्रमाणावर कांदा पिकाची लागवड केली आहे. डिसेंबर महिना सुरू झाला तरी रब्बी पीकांना पोषक असणारी थंडी अद्याप सुटलेली नाही. त्यामुळे पीकांची वाढ खुंटली आहे. रोजचे ढगाळ वातावरण आणि धुक्यामुळे ज्वारी, हरबरा, गहू या पीकांना माव्यासह तुडतुडे, चिकटा, करप्या या रोगांनी वेढले आहे. तर मका, तुर या पीकांवर लष्करी आळयांचा मोठया प्रमाणावर प्रादुर्भाव झाला आहे.

### कांद्याची मोठी लागवड

तालुक्यातील सुपा परिसर हा कांद्याचे आगार म्हणून ओळखला जातो. उत्पादनाच्या तुलनेत सध्या कांद्याला समाधानकारक भाव मिळत असल्याने सुपा, वाळवणे, आपधूप, वाघुंडे, हंगा, मुंगशी, म्हसणे, घाणेगांव, बाबुर्डी, रूईछत्रपती, पिंपरी गवळी, रांजणगांव मशिद, भोयरे गांगर्डा, कडूस, पळवे, जातेगांव आदी भागात कांद्याची मोठया प्रमाणावर लागवड करण्यात आली आहे.

### वैरणीचे उत्पादन घटणार

यंदा मुबलक प्रमाणात पाऊस झाल्याने पाणीही मोठया प्रमाणात उपलब्ध आहे. दुसरीकडे धुके व ढगाळ वातावरणामुळे पीकांसाठी पोषक वातावरण नसल्याने मुख्य पीक असलेल्या ज्वारी पीकाच्या तसेच जनावरांना वर्षभर लागणाऱ्या वैरणीच्या उत्पादनात मोठया प्रमाणावर घट होणार आहे.

### कांद्याच्या एकरी उत्पादनात घट होणार

आगोदर दुष्काळ आणि त्यानंतर अतिवृष्टीमुळे कांद्याचे बी व रोप उपलब्ध नसल्याने शेतक-यांनी सुमारे २० ते २५ हजार रूपये पायली दराने रोपे विकत घेउन लागवड केली. मात्र ढगाळ वातावरणामुळे या पीकाला रोगांची बाधा झाली आहे. परिणामी एकरी उत्पादनात मोठी घट होणार आहे.

**दिपक खंदारे**
प्रगतशील शेतकरी

### खरीप वाया, रब्बीवर भिस्त

तालुक्याच्या सुपा या जिरायती पटटयात चालू वर्षी पावसाने कृपा दृष्टी दाखवूनही शेतकऱ्याची झोळी मात्र रिकामीच राहणार आहे. गेल्या वष खरीप हंगाम पुर्णपणे वाया गेला. उशिरा का होईना परतीच्या पावसाने जोरदार हजेरी लावली आणि शेतकऱ्यांच्या आशा पुन्हा पल्लवीत झाल्या. नदी, नाले ओसंडून वाहू लागले. रब्बी हंगामासाठी लगबग सुरू झाली. शेतात उपळी असल्याने मुगाचे पीक तोडता आले नाही. काही शेतकऱ्यांनी उभ्या पीकावर पाळया घालून रब्बी हंगामातील ज्वारी, हरबरा, सोयाबीन, कापूस, तुर, मका, वाटाणा, गहू आदी पीकांचे पेरणी केली आहे. मुबलक पाणी असल्याने जनावरांसाठी घासाचे बी देखील मोठया प्रमाणावर टाकण्यात आले आहे.

### ज्वारी मोडून कांदा लागवड

शेतातील उपळीनंतर सुपा परिसरात कांद्याची मोठया प्रमाणावर लागवड झाली आहे. कांद्याला भाव मिळत असल्यानरे काही शेतकऱ्यांनी ज्वारी हे मुख्य पीक मोडून कांद्याची पेरणी केली आहे. सध्या दुधाला बाजारभाव नसल्याने गायींच्या किंमतीमध्ये कमालीची घट झाली आहे.३० ते ६० हजार रूपयांपर्यंत या किंमती खाली आल्या आहेत. या भागात दुग्धव्यवसाय मोठया प्रमाणात असल्याने त्या तुलनेत जनावरांसाठी कमी लागवडीमुळे वैरण मात्र उपलब्ध होणार नाही. १ ते २ हजार ५०० रूपये दराने विकला जाणारा कडबा ३ ते ४ हजार रूपये दराने विकत घ्यावा लागणार आहे.

**संजय पवार**
प्रगतशील शेतकरी, भोयरे गांगर्डा

# हरविलेले तीन तोळे सोने, आयफोन केला परत!

## मावळे यांच्या प्रामाणिकतेचे कौतुक | बाभुळवाडा ग्रामस्थांकडून सत्कार

बाभुळवाडे : प्रतिनिधी

**बाभुळवाडे गावातील गंगाराम पटाडे यांच्या मुलीचे तीन तोळे दागिने ,एक आयफोन आणि इतर किमती वस्तू असलेली पिशवी एकूण चार लाख रुपयाचा ऐवज बाभुळवाडे लोणीमावळा रस्त्यावर चार दिवसापूर्वी हरवली .ती पिशवी लोणी मावळा येथील पांडुरंग भाऊ मावळे यांना सापडली .त्यांनी सदर पिशवी कोणाची आहे याचा शोध घेऊन गंगाराम पटाडे यांना आणून दिली.मावळे यांच्या प्रामाणिक पणाबद्दल परिसरात कौतुक होत आहे.**



मावळे यांच्या प्रामाणिकपणाला शाबासकी म्हणून बाभुळवाडे ग्रामस्थ व गंगाराम पटाडे यांच्या तर्फे पांडुरंग मावळे यांचा फेटा,शाल श्रीफळ व योग्य ते बक्षीस देऊन आपलं गाव फाउंडेशनच्या कार्यालयात सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी श्री.गंगाराम पटाडे,बाबुराव पटाडे,सरपंच देवेंद्र जगदाळे, आपलं गाव फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ सुरेश राजाराम खणकर ,रजनीकांत जगदाळे, मनसुख कोरडे,दीपक जगदाळे,भाऊ चौगुले,अविनाश जगदाळे,जाधव गुरुजी,गणेश शिर्के,गुलाब शिर्के,वैभव शिर्के,कैलास खोडदे,सोमनाथ लामखडे,शरद जगदाळे,अनिल जाधव,विक्रम पवार,प्रतीक जगदाळे,कैलास मंडले,दत्तात्रय जगदाळे, भिवाजी जगदाळे इत्यादी ग्रामस्थ उपस्थित होते.

श्री.पांडुरंग मावळे हे शिवभक्त असून दर सोमवारी पायी लोणी मावळा येथून पायी श्री. केदारेश्वराचे दर्शनाला येतात. त्यांनी दाखवलेल्या प्रामाणिकपणा बद्दल पटाडे कुटुंब व बाभुळवाडे गाव कायम ऋणी राहील अशी प्रतिक्रिया डॉ.सुरेश खणकर यांनी व्यक्त करीत पांडुरंग मावळे यांचे कौतुक केले आहे.

# कोरठण खंडोबा गडावर शनिवारी चंपाषष्टी उत्सव

## देवस्थान ट्रस्ट कडुन तयारी पुर्ण | विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

पिंपळगाव रोठा : प्रतिनिधी

**राज्यस्तरीय ब वर्ग तिर्थक्षेत्र दर्जा प्राप्त असणारे पिंपळगाव रोठा येथील कोरठण खंडोबा देवस्थान गडावर चंपाषष्टी महोत्सवाचे शनिवार (ता.०७) रोजी आयोजन करण्यात आले आहे या निमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आल्याची माहीती ट्रस्टच्या अध्यक्षा शालिनी घुले यांनी दिली.**



या उत्सव निमित्त पहाटे चार वाजता खंडोबा मंगलस्नान पार पडल्यानंतर चांदीची सिंहासन पेटी व चांदीच्या उत्सव मूर्तीचे सिंहासनावर अनावरण होईल.उत्सव मूर्तींना साज शृंगारसह पुजा व महाआरती पार पडेल.अन्नदाते दिपक लंके व जया लंके यांच्या हस्ते अभिषेक, पुजा व आरती पार पडेल.गोरेगाव येथून आलेल्या पायी दिंडी सोहळ्याचे स्वागत करण्यात येईल.दुपारी अकरा वाजता अमरावती येथील पद्माकर देशमुख महाराज यांचा किर्तन सोहळा पार पडेल दुपारी एक वाजता शाहीर विलास अटक व शाहीर नामदेव शिंदे यांचे खंडोबाची गाणे स्पर्धा होईल दुपारी एक वाजता खंडोबा चांदीची पालखी व चांदीच्या उत्सव मूर्ती यांची नविन शाही रथातुन मंदिर प्रदक्षिणा मिरवणूक काढण्यात येईल.

यावेळी सकाळी अकरा वाजल्यापासून भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात येईल.मंदिर रंगकाम सह विविध विकासकामांसाठी भाविकांनी देणगी स्वरूपात मदत करावी असे आवाहन उपाध्यक्ष महेश शिरोळे,अशोक घुले,विश्वस्त ॲड.पांडुरंग गायकवाड,राजेंद्र चौधरी,चंद्रभान ठुबे,जालिंदर खोसे,कमलेश घुले,सुवर्णा घाडगे,तुकाराम जगताप,अजित महांडुळे,रामचंद्र मुळे धोंडीभाऊ जगताप,सुरेश फापाळे दिलीप घुले,महादेव पुंडे यांनी केले आहे.

# ३१ लाख खर्चून उभारणार निघोजचे प्रवेशद्वार!

## लोकसहभागातून होणार निघोजकरांची स्वप्नपूर्ती | गुरूवारी भुमिपूजन संपन्न

निघोज : प्रतिनिधी

**लोकसहभागातून ३१ लाख रूपयांचा निधी उपलब्ध करून निघोजच्या प्रवेशद्वाराची उभारणी होणार आहे. या प्रवेशद्वाराच्या निर्मितीनंतर निघोजकरांचे अनेक वर्षांचे स्वप्न पुर्ण होणार असून या कामाचा गुरूवारी भुमिपूजन समारंभ पार पडला.**



■ निघोज येथे लोकसहभागातून उभारण्यात येणाऱ्या प्रवेशद्वाराचे मान्यवरांच्या उपस्थितीत भुमिपुजन करण्यात आले.

शिवाजी लंके, ज्ञानेश्वर वरखडे, अमृता रसाळ, दिलीप ढवण, अर्जुन लामखडे, प्रा. ज्ञानेश्वर कवाद यांच्या पुढाकारातून हे काम हाती घेण्यात आले असून येत्या दोन दिवसांत या कामास प्रत्यक्ष सुरूवात होणार आहे.

या कामासाठी ३१ लाख रूपये खर्च अपेक्षित असून निघोज व मुंबईकर मंडळी त्यासाठी योगदान देणार आहेत. सध्याची वेशीचे शेकडो वर्षांपूर्वीचे बांधकाम असून उंची कमी असल्याने वाहने जाण्या येण्यासाठी अडचणी निर्माण होते. प्रवेशद्वाराजवळ नवी व जुनी पेठ, बाजारतळ, ऐतिहासिक व धार्मिक वारसा असलेल्या दोन बारव या भागात असल्याने हे प्रवेशद्वार नव्याने उभारण्याची मागणी होत होती. यावेळी सरपंच चित्रा वराळ, ज्ञानेश्वर वरखडे , शिवाजी लंके, अमृता रसाळ, देवराम लामखडे, निवृत्ती तनपुरे, मंगेश लाळगे, अर्जुन लामखडे, वसंत वांढेकर, संतोष रसाळ, रमेश वरखडे, शिवाजीराव वराळ, भाऊसाहेब लामखडे, विलास हारदे, मनोहर राऊत, यशवंतराव वराळ, नाना राऊत, दत्ता उनवणे, भास्कर कवाद, जयसिंग हरेल, रामराव वरखडे, अशोक ढवळे, शांताराम ढवळे, बजरंग वराळ, राजेंद्र लाळगे, बाबाजी तनपुरे, अर्जुन वराळ, भास्कर वराळ, अस्लम इनामदार , सुभाष वरखडे, बाबाजी तनपुरे, बाबुराव तनपुरे आदी उपस्थित होते.

### उंची, रूंदी वाढविणार

प्रवेशद्वाराची उभारणी करताना उंची व रूंदी वाढविण्यात येणार असून ऐतिहासिक वेशीचे संदर्भ लक्षात घेऊन नव्याने करण्यात येणाऱ्या उभारणीत तसे सुशोभिकरण करण्यात येणार आहे.

### जनभावनेचा आदर

छोटया गावांमध्येही नव्याने प्रवेशद्वारांची उभारणी झालेली असताना निघोजची लोकसंख्या, परिसर, गावाचा नावलौकीक पाहता हे प्रवेशद्वार उभारले गेले पाहिजे अशी सार्वत्रिक भावना होती. या भावनेचा आदर करून हे काम लोकसहभागातून हाती घेण्यात आले आहे.

# रांध्यामध्ये पंचाषष्ठी उत्सवाचे आयोजन

## महाप्रसादासाठी आमटी भाकरीचा बेत

रांधे : प्रतिनिधी

**सालाबादप्रमाणे यंदाही मार्गशिर्ष शुध्द ६, शनिवार दि.७ डिसेंबर रोजी चंपाषष्ठी उत्सवाचे आयोजन करण्यात आले असून या उत्सवानिमित्त आमटी भाकरीच्या महाप्रसादाचा बेत ठेवण्यात आला असल्याची माहीती रांधुबाई देवस्थान स्ट्रस्टचे उपाध्यक्ष विठ्ठल लक्ष्मण आवारी तसेच ग्रामस्थांच्या वतीने देण्यात आली.**



चंपाषष्ठी उत्सवासाठी रांधे ग्रामस्थ आणि रांधुबाई देवस्थान ट्रस्टच्या वतीने एकत्रीत नियोजन करण्यात आले असून या उत्सवात सहभागी होण्यासाठी उपस्थित राहणाऱ्याभाविकांची गैरसोय होणार नाही याची काळजी घेण्यात येणार आहे. दिवसभर दर्शन तसेच इतर कार्यक्रम पार पडल्यानंतर अळकुटी येथील शाहीर संतोष गुळवे यांच्या जागरण गोंधळाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून त्यासाठी भाविकांनी मोठया संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. जागरण गोंधळानंतर प्रसिध्द आमटी भाकरीच्या महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. महाप्रसादासाठी गावातून येणाऱ्या ग्रामस्थांनी किमान दहा भाकरी घेऊन येण्याचे आवाहन करण्यात आले आहे. भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेण्याचे आवाहन विठ्ठल आवारी यांनी केले आहे.

रांधूबाई देवस्थान ट्रस्टच्या वतीने गावातील ग्रामदैवत असलेल्या मंदीरांपैकी विठ्ठल मंदिर व रांधुबाई मंदिराच्या गळतीचे काम पुर्ण करण्यात आले आहे. उर्वरीत मंदिरांच्या गळतीचे काम हाती घेण्यात आले असून ज्या भाविकांना त्यांच्या इच्छेनुसार शक्य असेल त्या प्रमाणात सहकार्य करण्याचे आवाहन देवस्थान ट्रस्टचे विश्वस्त कैलास आवारी आणि किरण आवारी यांनी केले आहे.

# शांताबाई सोनवणे यांचे निधन

## माजी उपसरपंच उमेश सोनवणे यांना मातृशोक

निघोज : प्रतिनिधी

**निघोज गावचे माजी उपसरपंच व अल्पसंख्याक समाजाचे नेते उमेश मारुती सोनवणे यांच्या मातोश्री शांताबाई मारुती सोनवणे यांचे वयाच्या ८८ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले.**



मुंबई परिसरात गोरेगाव उपनगर शहरांमध्ये सामाजिक कार्याच्या माध्यमातून त्या सातत्याने सक्रीय असत पारनेर तालुका तसेच विशेष करून अहिल्यानगर व पुणे जिल्ह्यातील मुंबई स्थायिक जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी शासकीय दरबारी त्या सातत्याने आघाडीवर असत. गोरेगाव शहरात त्यांचा विशेष दबदबा होता. सर्वसामान्य जनतेला आधार देणारे एक महिला भगीनी म्हणून त्यांचा मुंबानगरीत लौकिक होता.निघोज आणि परिसरातील समाज बांधवांसाठी त्यांचे काम विकासाभिमुख होते.

त्यांच्या पश्चात तीन मुले, एक मुलगी, सुना नातू असा मोठा परिवार आहे. सामाजिक कार्यकर्ते राजू सोनवणे, माजी उपसरपंच उमेश सोनवणे, मुंबई परिसरातील उद्योजक व सामाजिक कार्यकर्ते नरेश सोनवणे, रंजना अशोक मोरे यांच्या त्या आई होत. निघोज येथील स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी विविध संस्थांचे पदाधिकारी व ग्रामस्थ तसेच मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी निघोज ग्रामपंचायत, ग्रामस्थ व मुंबईकर मंडळ तसेच डॉ बाबासाहेब आंबेडकर स्मृती संघ मुंबई , अल्पसंख्याक समाज मंडळ व निघोज तसेच पारनेर तालुका पत्रकार संघ व मराठी पत्रकार संघ यांच्या वतीने श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

# डॉ. राऊत दाम्पत्याने दिले संदीप पुंडे यांना जीवदान!

## नाग चावल्याने पुंडे झाले होते अत्यावस्थ

अळकुटी : प्रतिनिधी

**शेतामध्ये पिकांना पाणी भरत असताना विषारी नागाने दंश केल्याने अस्वस्थ झालेल्या संदीप बन्सी पुंडे या तरूण शेतक-याला नारायणगांव येथील डॉ. सदानंद व पल्लवी राऊत या दाम्पत्यासह त्यांच्या टीमने अथक परिश्रम घेत जीवदान दिले. त्यांच्या या परिश्रमाबद्दल संदीप यांचे बंधू भालचंद्र पुंडे यांनी कृतज्ञता व्यक्त केली.**



गेल्या महिन्याच्या शेवटच्या आठवडयात संदीप पुंडे हे दुपारी शेतामध्ये पिकांना पाणी देत होते. पाणी देत असताना त्यांना अतिविषारी नागाने दंश केला. त्यांना त्रास होऊ लागल्याने त्यांनी घरी जाऊन घटनेची माहीती दिल्यानंतर भालचंद्र पुंडे व त्यांच्या सहकाऱ्यांनी त्यांना नारायणगांव येथील डॉ. राऊत यांच्या विघ्नहर नर्सिंग होमध्ये घेऊन जाण्याचा निर्णय घेतला.

संदीप यांना वाहनातून घेऊन निघाल्यानंतर डॉ. राऊत यांना संपर्क करण्यात येऊन झालेल्या सर्प दंशाची माहीती देण्यात आली. नारायणगांवपर्यंत पोहचेपर्यंत संदीप यांचा श्वासोच्छवास क्षीण होत चालला होता. डॉ. राऊत यांच्या हॉस्पिटलच्या दारात पोहचताच तिथे डॉ. राऊत व त्यांची टीम सज्ज होती.

हॉस्पिटलबाहेरूनच संदीप यांच्यावर उपचार सुरू करण्यात आले. हॉस्पिटलमध्ये नेण्यात येउन क्षीण झालेला श्वासोच्छवास पुर्ववत करण्यासाठी कृत्रीम श्वासोच्छवास देण्यात आला. प्राथमिक उपचार झाल्यानंतर सर्पदंशावरील लसीचे २० इंजेक्शन देण्यात आली. त्यानंतर २४ तासानंतर संदीप हे पुर्णपणे शुध्दीवर आले आणि पुंडे कुटूंबाचा जीव भांडयात पडला !

### भालचंद्र पुंडे यांची कृतज्ञता

परिस्थिती विचारात घेऊन डॉ. राऊत व त्यांच्या टीमने तात्काळ उपचार सुरू केले. काही मिनिटे उशीर झाला असता तर आम्हाला आमचा भाऊ पहायला मिळाला नसता. डॉ. सदानंद राऊत, डॉ. पल्लवी राऊत, डॉ. साहिल शेख व त्यांच्या सर्व टीमप्रती कृतज्ञता व्यक्त करतो.

**भालचंद्र सखाराम पुंडे**

### बेशुध्द होऊन नाडीचे ठोकेही कमी झाले

संदीप यांना वाहनात बसविल्यानंतर आळे गावापर्यंत जाईपर्यंत संदीप हे वाहनातील इतरांशी बोलत होते. पुढे गेल्यानंतर त्यांचे बोलणे बंद झाले. त्यांना डोळे देखील उघडता येत नव्हते. उलटी होऊन ते बेशुध्दावस्थेत चालले हाते. जलद गतीने वाहन चालवूनही रस्ता आटोपत नव्हता. नारायणगांवपर्यंत पोहचेपर्यंत संदीप हे पुर्णपणे बेशुध्द होऊन त्यांच्या नाडीचे ठोकेही कमी झाले होते.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com